Vol 3 Issue 11 Dec 2013

ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

## Welcome to ISRJ

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest,Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University


**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume-3, Issue-11, Dec-2013
ISSN 2230-7850
Available online at www.isrj.net

# मानव अधिकार संरक्षणात पोलिस प्रशासनाची भूमिका

**बी.एस. पिंपळे , गजानन देवराव चिट्टेवाड**
संशोधन मार्गदर्शक लोकप्रशासन विभागप्रमुख, मत्स्योदरी महाविद्यालय, जालना
लोकप्रशासन विभागप्रमुख, धारेश्वर शि.सं. औ'बाद संचलित कला व विज्ञान महाविद्यालय, चिंचोली, (लिं.) जि. औरंगाबाद

***सारांशः***मानवाधिकाराची व्याप्ती आणि स्वरुप खुप विस्तृत आहे. मानवाधिकाराच्या संरक्षणासाठी आपल्या देशात जी संविधानिक घटनात्मक व्यवस्था आहे. त्याने प्रामुख्याने पोलिस प्रशासनाचे आणि न्याय व्यवस्थेचे अत्यंत महत्त्वपूर्ण स्थान आहे. त्यामुळे पोलिस प्रशासनाकडून विशेष कार्याची व प्रभावी भूमिकेची आणि हस्तक्षेपाची अपेक्षा केल्या जाते. भारतात आणि जगात पोलिस प्रशासनाला संविधानिक नियम अधिनियमाची अंमलबजावणी करणारी सगळ्यात मोठी संघटना, प्रशासन व्यवस्था म्हणून ओळखल्या जाते. पोलिस प्रशासनाचे प्रत्येक कार्य जनतेची प्रतिष्ठा, आत्मसम्मान त्याचे वैयक्तिक जीवन, घटनात्मक अधिकार इत्यादीला प्रभावीत करु शकते. भारताने व राज्यशासनाने जनतेचा सर्वांगीण विकास करण्यसाठी कल्याणकारी धोरणाचा स्वीकार केल्याने एकीकडे पोलिस प्रशासनाकडून जनतेच्या अपेक्षा वाढत आहेत. त्याच वेळेस समाजात शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करण्यामध्ये आणि गुन्हे नियंत्रीत करण्यामध्ये पोलिसाच्या अडचणी वाढत आहेत. यामध्ये मुख्यत्वाने समाजातील जबाबदार प्रतिष्ठित व्यक्तीकडून प्रशासनातील अधिकाऱ्याकडून आलेल्या सुचना, शिफारशी याची अवहेलना करणे त्याशिवाय स्वतः पोलिस प्रशासनाची समाजात पडलेली नकारात्मक छाप मुख्य बाब आहे.

***प्रस्तावनाः—***

जनतेचा विश्वास संपादन करावयाचा असेल आणि कार्यक्षमता वाढवायची असेल तर पोलिस प्रशासनाच्या कार्यपद्धतीत पारदर्शता असणे अत्यंत आवश्यक आहे. त्याशिवाय पोलिस प्रशासनाकडून घटनात्मक नियमांचा आदर अपेक्षित आहे. यासाठी कडक नियम शिस्थ उच्च मनोबल, नैतिकता आणि अधिक प्रयत्नाची आवश्यकता आहेच त्याशिवाय प्रशासनात अधिक—अधिक संसाधन व सोयी सुविधांची अत्यंत आवश्यकता आहे.

भारताच्या संविधानात न्याय प्रणालीत, घटनात्मक कायद्यात तसेच प्रशासन प्रक्रियेमध्ये सतत मानव अधिकार संरक्षणाची एक सशक्त व्यवस्था व श्रृंखला स्पष्ट स्वरुपात दिसून येते. पेलिस प्रशासन फौजदारी व न्यायिक प्रणालीचा महत्त्वपूर्ण व व्यापक स्वरुपात दिसून येणारा भाग आहे. घटनात्मक नियंत्रण प्रस्थापित करणारी सर्वात मोठी प्रशासन यत्रणा म्हणून समाज पोलिस प्रशासनाकडे बघतो त्यामुळे जेव्हा नियमानुसार एखादे कार्य हे पोलिस प्रशासनाचे नसून किंवा यांच्या अधिकारक्षेत्राच्या बाहेरचे कार्य असताना जनता पोलिस प्रशासनाकडून हस्तक्षेपाची अपेक्षा करते परंतु तेव्हाच समाजातील कमीत—कमी एखादा वर्ग तरी पोलिस प्रशासनाला दोष देतो. किंवा चुकीचे मानतो.

मानव अधिकाराची घटनात्मक व्याख्या मानव अधिकार संरक्षण अधिनियम 1993 मध्ये दिल्या गेली आहे. परंतु यामध्ये कोणत्याही नवीन अधिकाराचा समावेश केलेला नाही. जे अधिकार यामध्ये सामाजिक आहेत ते तर प्रत्येक व्यक्तीला स्वतः उपलब्ध आहेत. प्रामुख्याने या अधिनियम अंतर्गत येणारे अधिकार म्हणजे मानवी जीवन, स्वातंत्र्य, समता तसेच प्रतिष्ठा या संकल्पनाचा अधिकाराचा समावेश यात आहे. सामाजिक परिवर्तन तसेच कालानुरुप विकास साध्य करण्यासाठी या अधिकाराची व्याप्ती तसेच खोली, महत्त्व वाढत आहे. कारण विविध न्यायालयाने वेळोवेळी दिलेले निर्णय या संदर्भात महत्त्वपूर्ण भूमिका निभावत आहेत. स्वातंत्र्य प्राप्ती पासून आजपर्यंत मानव अधिकाराचे स्वरुप, व्याप्ती, तसेच व्यापक दृष्टिकोणामध्ये दिशामध्ये, अभुतपूर्व विस्तार झाला आहे. पोलिस प्रशासनाचा जनतेशी सतत अत्यंत जवळचा संबंध व संपर्क असतो. पोलिस तसेच व्यक्ती किंवा जनसमुह यांचा संबंध विशेष करुन त्या वेळेस येतो जेव्हा जनता व्यक्ती किंवा समुह सर्वाधिक आक्रमक होतात. तसेच ते असुरक्षित असतात, त्या शिवाय ते घाबरलेले असतात, जेव्हा ते हतबल झालेले असतात, जेव्हा ते नशेमध्ये राहतात, जेव्हा अपमानित होतात, तेव्हा तेव्हा पोलिस प्रशासनाशी जनतेचा संबंध येत असतो. कारण अंतिमता पोलिस प्रशासनाचे प्रत्येक कार्य हे जनतेची प्रतिष्ठा, आत्म—सम्मान, त्यांची एकातता, शांती किंवा घटनात्मक अधिकार कायदे यांना प्रभावित करु शकते कारण त्यांची कार्यद्धतीच या व्यवहाराशी संबंधीत असते.

मानव अधिकारांसदर्भात शासन व्यवस्थेकडून जनतेच्या अपेक्षा वाढत आहेत. कारण शासनाने कल्याणकारी धोरणाचा व सर्वांगीण विकास या संकल्पनेचा स्वीकार केल्याने साहजिकच जनतेच्या अपेक्षा वाढण्यात भर पडते आहे. त्याचबरोबर समाजात शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करण्यामध्ये आणि गुन्हे नियंत्रित व आटोक्यात आणण्यात तसेच त्याचे योग्य व्यवस्थापन करण्यात पोलिस प्रशासनाला अपयश व अडचणीचे होत आहे. घटनात्मक कायदे नियम, उपनियमाचे, पालन न करण्याकडे व्यक्तीचा स्वभाव सध्या झुकत आहे. जो सार्वजनिक जीवनात प्रतिष्ठित पदावर आहे किंवा कार्य करतो. अशा लोकामधूनच काही व्यक्ती त्यांच्या वैयक्तिक व्यवहारात जीवनात कायदे नियमांना त्यांच्या बांधवांना झुगारत आहेत. त्याशिवाय शासकीय नियमाची दुर उपयोग आपल्या इच्छेनुसार व मतानुसार करण्याची समाजात प्रथाच पडलेली दिसून येते. यात पोलिस प्रशासनाबरोबरच सर्वच शाखांचा समावेश असल्याचे दिसून येते. कोणतीही घटनात्मक व्यवस्था सुव्यवस्थित आणि योग्यरित्या तेव्हा लागू केल्या जाऊ शकते जेव्हा समाजामधील जवळपास सर्वच स्तरातील लोक त्या व्यवस्थेला पुर्णतः सर्व बाजुंनी स्विकारतील आणि अशा वेळेसच आणि व्यवस्थेत ज्या विभागाला दंड, गुन्हे, अपराध नियंत्रीत करण्याची शक्ती अधिकार बहाल केले गेले आहेत. किंवा घटनात्मक नियमांचे उल्लंघन रोकण्याची

जबाबदारी देण्यात आली आहे. ती जबाबदारी योग्यरित्या व प्रभावीपणे पार पाडू शकतात. त्याचबरोबर घटनात्मक, नियमांचे पालन न करण्याऱ्या व्यक्तींना रोकू शकतात व त्यावर कार्यवाही करण्यास यंत्रणा सक्षम असते.

मानव अधिकार संरक्षण परिक्षेत्रामध्ये फौजदारी न्याय प्रणालीचे व्यवस्थेचे मुख्य तीन ध्येय आहेत. यामध्ये 1) समाजात शांतता, सुव्यवस्था राखणे तसेच सुरक्षितता आणि अपराध, गुन्हेगारी प्रवृत्तीवर नियंत्रण ठेवणे आणि नियंत्रणाचे वातावरण सतत प्रस्थापित करणे, 2) गुन्हेगारांना न्याय बुद्धीने शिक्षा करावी तसेच शिक्षेनंतर त्यांना पुन्हा समाजामध्ये अपमानजनक वागणुक मिळणार नाही या दृष्टिनेत त्यंना समाजात पुन्हा स्थापित करावे. ज्यामध्ये तो व्यक्ती सुरक्षित, भयमुक्त, जीवन जगु शकेल. 3) न्यायालयीन व्यवस्थेने कार्यरत असलेल्या व्यक्तींनी स्वतः मानव अधिकाराचे उल्लंघन, हनन, कदापी करू नये हे मानवाधिकाराच्या परिक्षेत्रातील अंतिम उद्दिष्टे आहे.

या यंत्रणेचे मुख्य भाग व शाखा म्हणजे पोलिस प्रशासन, मानव अधिकार आयोग, न्यायायल आणि कारागृह विभाग म्हणून सांगता येतो. या सर्व शाखांनी आपआपल्या अधिकार क्षेत्रात राहून कार्य करणे बंधनकारक व अनिवार्य आहे.

आपल्या अधिकार क्षेत्राच्या बाहेर जाऊन जर कोणी कार्य करत असेल तर त्या प्रमाणात त्यांची वर्तणुक अधिकार क्षेत्राच्या बाहेर जाण्याची संभावना वाढत जाईल आणि त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षितेतेचा प्रश्न निर्माण होऊन मानव अधिकारांचे संतुलन बिघडण्याची तितकीच प्रबळ संभावना वाढेल.

राष्ट्र आणि राज्याच्या सार्वभामत्वाचे एक सर्वसमान्य चिन्ह, संकेत म्हणजे समजामध्ये शांतता आणि सुव्यवस्था कायम राहने आहे. याची जबाबदारी, उत्तरदायित्त्व समाजात सुरक्षितता प्रस्थापित करणाऱ्या प्रशासकीय यंत्रणेकडे नैसर्गिकरित्या हस्तांतरित होते आज मानव अधिकाराची प्राथमिक संकल्पना व विचारात परिवर्तनाबरोबरच विकास भी होत आहे. याला अनुसरून राज्य हे आपल्या विविध यंत्रणाद्वारे प्रणालीद्वारे मानव अधिकाराच्या उल्लंघन व हनन होण्या संदर्भात नेहमी जबाबदार उत्तरदायी राहिले आहे. परंतु आधुनिक विचार प्रवाह हा आहे की, राज्याने इतर व्यक्तीकडून किंवा संस्था, प्रशासकीय यंत्रणेकडून जेव्हा मानव अधिकारावर अतिक्रमण व उलंघनाच्या घटना त्याची जबाबदारी राज्य सरकारने घेवून पीडित व्यक्तीला घडतात. अनुदान द्यावे मग हे हनन प्रशासकीय यंत्रणा किंवा समाजातील प्रतिष्ठित नागरिक वा पदाधिकाऱ्याचे का केले असेना.

या संदर्भात काही आधारभूत तथ्यावर प्रकाश टाकणे योग होईल. भारतातील मानवी हक्क आयोगाकडे सन 2013 पर्यंत नविन आणि जुन्या अर्जाची संख्या 26227 एवढी आहे आणि हे सर्व विचाराधीन अर्ज म्हणून याची नोंद दाखविलेली आहे. त्यामुळे यातील जवळपास अर्धाच्या वर संख्या ही वेगवेगळ्या राज्यातून आलेल्या पोलिस प्रशासनाशी संबंधीत केसेस असल्याचे शक्यता नाकारता येत नाही.

महाराष्ट्र मानवी हक्क आयोगाकडे सन 2010–11 या वर्षात एकूण 1454 तक्रारी प्राप्त झाल्या होत्या, त्यातल 916 प्रकरणे प्रलंबित राहिली होती. 2011–12 या वर्षात प्रलंबित अर्जाची संख्या 4947 झाली, मग यानंतर अध्यक्ष आणि सदस्य नसल्याने प्रलंबित तक्रारी अर्जाची संख्या 11373 झाली आहे त्यामुळे उपलब्ध आकडेवारीनुसार आयोगाकडे सन 2012–2013 मध्ये तब्बल 11 हजार 373 अर्ज प्रलंबित आहेत. त्यातील 4 ते 5 हजार तक्रारी–अर्ज हे पोलिस प्रशासनाच्या अख्यातरीत व त्यांनी उल्लंघन केलेल्या केसेस असतील यात काहीच शंका नाही. मग त्यात (Torture, Illegal detntion, Unlawful, Arrest, False) इत्यादी मार्गाने पोलिस प्रशासनाकडून मानवी हक्काचे उल्लंघन व हनन च्या केसेस व तक्रारी झाल्याच्या दिसून येतात. येथे ही स्पष्ट करणे आवश्यक आहे की, कायद्यातील कलम 12 (ए) नुसार मानव अधिकार आयोगाचे लक्ष हे जन कल्याणार्थ कार्य करणाऱ्याकडून मानवी हक्काचे हनन किंवा हनन रोकण्यामध्ये बेजबाबदरीचे वर्तन करणाऱ्या यंत्रणेवर व विभागाच्या प्रकरणावर केंद्रित असते. परंतु येथे पोलिसांच्या संबंधीत एवढ्या मोठ्या संख्येने मानव अधिकाराचे हनन, व उल्लंघनाच्या केसेस किंवा तक्रारीमध्ये अधिकाधिक मानव अधिकाराचे हनन रोकया मधील अडचणी व अपयशचे आरोप असल्याचे दिसून येते. येथे केवळ एका कारणाची ओळख करावयाची असेल तर ते म्हणजे प्रामुख्याने पोलिस प्रशासनाकडून प्राथमिक अर्ज किंवा तक्रार न नोंदवून घेणे हे सांगता येईल. तसेच पोलिस प्रशासनाकडे तक्रार नोंदविण्यास न जाणे हेही एक कारण म्हणून सांगता येते कारण सामान्य मानसाच्या मनात ही धारणा घर केलेली आहे कि पोलिस हे खुप कठोरतेने गुन्ह्याची नोंद करताना वागातत किंवा चौकशी करतात. असेही आरोप पोलिस प्रशासनावर सरळ सरळ लावले जातात. त्याशिवाय अनेक वेळा मानव अधिकाराचे उल्लंघनाचे मुळ कृत्य दुसऱ्या विभागाचे असले तरी तेही आरोप नंतर सरकत सरकत पोलिस प्रशासनावर आलेले आहेत?असे किती तरी उदाहरणे उत्तर प्रदेश मानवी हक्क आयोगाकडे आणि महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाकडे आले आहेत. तसेच काही आरोप तक्रारी या सरळ पोलिस प्रशासनाकडून मानवी हक्क उल्लंघनाच्या आहेत. त्यामुळे जनता हे पोलिस प्रशासनाच्या कार्यपद्धतीकडे एकीकडे अविश्वासाने बघते तर दुसरीकडे पोलिस प्रशासनाकडून सुरक्षेची अपेक्षा आणि मानव अधिकाराचे संरक्षणा संदर्भात अपेक्षाही ठेवल्या जातात त्यामुळेच ही परिस्थिती उद्भवते आहे.

मानव अधिकार संरक्षणाच्या संदर्भात काही प्रमाणात पोलिसांची समाजात पडलेली नकारात्मक छाप व प्रतिमेचे काही कारणाचा उल्लेख येथे करणे योग्य होईल. आज पोलिस कर्मचाऱ्यांना वर्तन आणि नैतिक मुल्याची शिकवण प्राथमिक प्रशिक्षण देताना केली जाते. त्यामध्ये मानव अधिकार संरक्षणाचाही समावेश आहे. विशेषतः जेव्हा हे कर्मचारी त्यांच्यामुळे ठिकाणी कार्यक्षेत्रात कार्य करतात. तेथे प्रशिक्षणातील शिकवणीची वेळोवेळी आठवण करून कार्य करीत नाहीत तर ते प्रशिक्षण केंद्रावरच ठेवतात. परंतु गुन्हे नियंत्रणासाठी व यशस्वी होण्यासाठी प्रशिक्षणावेळी जे शिकवले गेले ते कारणे आवश्यक आहे. परंतु आज पोलिस प्रशासनातील जास्तीत जास्त कर्मचारी हे आपली नैतीकता सोडून भ्रष्टाचार, वसीलेबाजी, राजकारणाच्या दबावाखाली दबल्या चालले आहेत. त्यामुळेच गुन्ह्याची अधिकृत आकडेवारी संख्येत कमी आणि समाजातील वास्तविक गुन्ह्यांची आकडेवारीत यात खुप तफावत आहे. त्यामुळे पोलिस प्रशासनाला प्रशिक्षण केंद्रावरील शपथ आठवून व आपल्या नैतिकतेवर कायम विश्वास ठेवणे आवश्यक आहे. त्याशिवाय संपूर्ण सेवा कालावधीत नैतिकततेला सांभाळण्यासाठी पारदर्शक पणे कार्य करण्याची गरज निर्माण झाली आहे.

हे सांगत असतांना आपल्याला हे ही लक्षात घ्यावे लागते की, प्रत्येक पोलिस कर्मचारी हा एका समुहाचा सदस्य असून त्याच समाजाच्या प्रवृत्तीचा तो एक घटक आहे. समुहाची नैतिकता प्रश्न हे वैयक्तीक नैतिकता प्रश्नावून निश्चतच वेगळे असतात. समुहाचा एक दृष्टिकोन असतो जो कधी भयानक तर कधी समजण्या पलिकडे असे त्याचे स्वरूप असते समुह हा एका मर्यादेपर्यंत समाजातील

प्रत्येक सदस्याच्या कार्यपद्धतीवर, कार्यप्रणालीवर केवळ प्रभाव टाकत नाही तर त्याला नियंत्रित करण्याचेही कार्य करतो. येथे विचार करण्यासारखी बाब म्हणजे पोलिस प्रशासनाची कठोर, कडक, प्रशासन व्यवस्था, घटनात्मक बंधने, त्यातून पोलिस प्रशासनाला आलेले वैफल्य नकारात्मक स्वरूप असल्याचे दिसून येते त्या शिवाय अंतर्गत प्रभाव वाढण्याचे महत्त्वाचे कारण पोलिस प्रशासनात असलेला बाह्य हस्तक्षेप व दबाव यामुळे याचे स्वरूप अधिक गंभीर होत आहे.

पोलिस कर्मचाऱ्यामध्ये उच्च कोटीची सर्वोत्तम शारीरिक क्षमता, स्वास्थ स्तर, नैतिक विचारांच्या व्यक्तींना सामावून घेण्याची क्षमता आहे. परंतु आजच्या काळात अधिकाधिक पोलिस कर्मचारी, सामाजिक, भावनात्मक, नैतिक, मनस्वास्थाखाली दबून खालच्या स्तरावर पोहचत आहेत. आपल्याला हे निश्चितच नाकारता येत नाही कि, पोलिस कर्मचाऱ्यामध्ये नशेची सवय कौटुंबिक समस्या भांडणे शारीरिक समस्या, मानसिक तनावाची परिस्थिती, यातून आत्महत्येस प्रवृत्त होणारे कर्मचारी आणि दुसरीकडे गुन्हेगारी प्रवृत्तीस साथ व सहभागी होण्याची प्रवृत्ती वाढत आहे. हे सर्व समाजात राहणीमानात झालेले बदल त्या तुलनेत पोलिसांना आर्थिक चणचण, सुविधाची कमतरता तसेच पोलिस प्रशासनाची कार्यपद्धती, कार्याचा बोजा, परिणामी हे सगळ घडत आहे. वरीष्ठ पातळीवर विचार करण्यासारखी बाब म्हणजे कोणत्याही देशात पारदर्शी वास्तविक, समाज उपयोगी व समाजाच्या हिताची पोलिस व्यवस्था स्वस्तात चालवल्या जात नाही. हे लक्षात घेणे तितकेच महत्त्वाचे आहे.

पोलिस प्रशासनाच्या कार्यपद्धती मध्ये मानव अधिकाराचे संरक्षण हे पुर्णपणे संविधानामक घटनात्मक स्वरूपाची मान्यता आहे कोणतेही न्यायालय किंवा आयोग पोलिस प्रशासनाला त्यांच्या नियमाचे व कायद्याची अंमलबजावणी किंवा वापर करण्यासापासून थांबवू शकत नाही. आपल्या हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे किं संविधान, कायदे, नियम कलमे आणि प्रशासकीय आदेशाचा भडीमार असताना पोलिस कर्मचारी ह्या परिस्थितीत कार्य करतात जेथे त्यांना स्वविवेकाचा वापर अनिवार्य पणे करावा लागतो. पण दुर्लक्षित करून कनिष्ठ स्तरावरील पोलिस कर्मचारी स्वविवेकाचा वापर जास्त करतात जास्तीत जास्त पोलिस कर्मचारी एकटे कार्य करतात. जेथे मार्गदर्शकांची वरिष्ठाची आवश्यकता कमीत कमी असते. शेवटी जेव्हा पर्यंत मानव अधिकार संरक्षणाची भावना नैसर्गिक रित्या पोलिस कर्मचाऱ्यांच्या कार्यपद्धतीमध्ये रूजत नाही तो पर्यंत समस्या सोडवणे अवघड आहे.

कोणतीही घटनात्मक व्यवस्था सुव्यवस्थित स्वरूपात तेव्हाच लागू केल्या जाउ शकतो की समामाजतील अधिकाधिक नागरिक व्यवस्थेला स्वईच्छेने स्विकारतील अशा वेळेसच कायद्याचा भंग किंवा उल्लंघन करणाऱ्या व्यक्ती विरूद्ध कार्यवाही करण्यास पोलिस यंत्रणा सक्षम असते आणि प्रभावरित्या अधिकाराचा वापरही करू शकते.

हे सर्वमान्य आहे की जर पोलिस कर्मचारी आपली क्षमता प्रभावीरित्या राबवून मानव अधिकार संरक्षणाप्रती एकनिष्ठ, कटिबद्ध राहतील तेव्हाच जनतेचा पांठिबा मिळू शकेल. लोकशाही व्यवस्थेत तरी दुसरा कोणता मार्ग पाठिंबा मिळवण्याचा उपलब्ध नाही उदा. राजेशाही, एकाधिकारशाही लष्करशाही या एकावेळी तेथील सुरक्षा यंत्रणेला पांठिबा देवु शकतील परंतु भारतात हे अशक्य आहे. बऱ्याच कालावधीनंतर भारती पोलिस आणि जनता यांच्यातील परस्पर संबंध सुधारण्यावर भर दिल्या जातोय. उदा. सकाळ दैनिकांने पोषक आहारा संदर्भात पोलिसासाठी राबवत असलेल्या कार्यक्रम व पोलिस प्रशासनाद्वारे पोलिस जनतेचा मित्र हा कार्यक्रम व योजना यातुन जनता व पोलिस प्रशासनात सलोख्याचे संबंध निर्माण होण्यास मदत होत आहे. हे जरी होत असले तरी तेवढ्या प्रमाणात काही जास्तीचे यश मिळालले नाही. त्यामुळे पोलिस प्रशासनावर जनता तेव्हाच अस्था व विश्वास ठेवेल जेव्हा पोलिस प्रशासन मानवी हक्क संरक्षणाप्रति कटिबद्ध होईल.

पोलिसांच्या कार्यपद्धती मधून किंवा कार्यातून अनेक व्यक्तींच्या किंवा समुहाच्या अवैद्य हितावर आघात होवू शकतो. त्यामुळे योग्य व अचुक कार्य करण्यासाठी जनतेचा पाठिंबा मिळणे तेवढेच आवश्यक आहे. यातून असे अनुभवास येते की, पोलिस प्रशासनाता योग्य व यशस्वी पणे कार्य पार पाडावयाची झाल्यास कायद्यातील नियमात वाढ करणे आवश्यक आहे. पोलिस विभागाद्वारे वेळोवेळी व्यावसायिक स्वायत्तता आणि विशेष कायदे नियमाची मागणी करण्यात येत आहे. कारण अधिक प्रभावीरित्या गुन्ह्यावर नियंत्रण प्रस्थापित करून समाजात शांतता व सुव्यवस्था निर्माण करता येईल.

विशेष अधिकाराची मागणी आंतकवादी, मावोवादी नक्षलग्रस्त भागात, जास्तीची व प्रभावीरित्या होत आहे. या व्यतिरिक्त समाजातील महत्त्वपूर्ण वर्गाची विचारधारा अशी आहे की जे अधिकार संविधानाने यांना बहाल केले आहेत त्याच्याच वापर योग्य रित्या होत नाही. त्याच बरोबर राज्य शासनाद्वारे आणि प्रशासनाद्वारे असे कोणतेच कार्य होत नाहीत कि ज्यामुळे समाजातील असंतोषाची भावना तसेच असंतुलन कमी होईल त्यामुळे या विचारधारेमुळे कोणत्याही विशेष अधिकार बहाल करण्याची तसेच नविन कायदे तयार करण्याची गरज नाही. सध्याच्या काळात न्यायालय मुख्य समुह आणि समाजातील कोणताही पक्ष पोलिस प्रशासनाच्या अधिकारामध्ये वाढ करण्यासंदर्भात सकारात्मक विचाराचा नसल्याचे दिसून येते.

कायद्यानुसार जर यंत्रणा कार्य करत असेल तर समाजात त्या यंत्रणेबद्दलची विश्वासहार्त वाढते त्यातून समाज त्या यंत्रणेच्या छोट्या, मोठ्या चुका कडे दुर्लक्षही करण्यास तयार असतो. परंतु सध्या आधुनिक काळात न्यायालयीन व्यवस्थेवर किंवा कोणत्याही व्यवस्थेवर संविधानाचा घटनांचा अधिकाधिक दबाव आहे. गुन्हेगाराचे मनोबल मुख्यत्वेने यामुळे वाढले आहे यामधील काही व्यक्ती सरळ राजकीय सत्ता प्राप्त करण्यामध्ये यशस्वी झाले आहेत. त्याशिवाय त्यांना मोठ्या व्यक्तीचा पाठिंबा, सुरक्षा मिळाली आहे. असे वाटते की पुर्णतः बेजबाबदारी, अनौपचारिक प्रक्रिया, औपचारिक व्यवस्थेच्या कार्यपद्धतीवर प्रभाव टाकून वरचढ होण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न करीत आहे. अशा परिस्थितत पोलिसाकडून काही चुकीचे व असंविधानीक कार्य घडून आले तर त्यांना संरक्षण देण्याची क्षमता आणि व्यवस्था कोणत्याच स्तरावर नसल्याचे दिसून येते.

या अगोदर काही मर्यादेपर्यंत अशी व्यवस्था होती. परंतु सध्या पोलिस कर्मचाऱ्यानी सत्य निष्ठेने कार्य करताना काही दोष राहिले किंवा चुकन झालेतरी समाजातील अधिकाधिक नागरिक त्यांच्या कार्यपद्धतीला दोष पुर्णच मानतात. वास्तविकतः पोलिस प्रशासनाला घटनेच्या मुळाशी जावून मुळ गुन्हेगाऱ्यांना शोधावयाचे असते त्यामुळे ही माहिती मिळवताना त्यांच्याकडून कधी योग्य तर कधी अयोग्य प्रकारचे वर्तन व कार्य करावे लागतात एंवणा केली जातात. परंतु हे कोणत्याही पोलिस प्रशासनासाठी व कर्मचाऱ्याच्या मानसिक दृष्टिकोणातून योग्य राहत नाही. माझ्या मते उच्च स्तरीय नियम आणि योग्य मानसिकतेशिवाय पोलिस प्रशासनातील कर्मचारी आपले उत्तरदायित्व जबाबदारी योग्यरित्या पार पाडू शकत नाहीत यात काहीच शंका नाही.

*सारांश :*

शेवटी या अयोग्य आरोपासून वाचवण्यासाठी आणि आपली कार्य पद्धती वृद्धींगत करण्यासाठी जनतेचा विश्वास संपादन करणे पोलिस प्रशासनासाठी अनिवार्य अपरिहार्य झाले आहे. पोलिस प्रशासनाच्या कार्यपद्धतीत पारदर्शकता, घटनात्मकता कायद्याच्या बंधनाचा आदर व पालन त्याच बरोबर मानव अधिकार संरक्षण करण्याचेच मार्ग विभागाची प्रतिमा सुधारण्याचे पोलिस प्रशासनासमोर आज उपलब्ध असल्याचे दिसून येतात. हे सर्वांना माहित आहे की कायद्याच्या चौकटीत कार्य करण्यासाठी अधिक मेहनत, आणि इच्छा शक्तीची आवश्यकता असते, तसेच पोलिस प्रशासनाला अधिकाधिक सुरक्षा, सोयी, सुविधा आणि संसाधानाची उपलब्धता असणे तितकेच महत्त्वाचे आहे.

मानव अधिकार संरक्षणाचा संकल्प हा पोलिस प्रशासनाच्या कार्यपद्धतीच्या प्रत्येक स्तरावर करावा लागेल परंतु पोलिस कर्मचाऱ्यांच्या प्रत्येक स्तरावरील कार्य हे अधिकारपद परंपरेचे आहे आणि त्यातून अधिकाराचे प्रदत्तीकरण झालेले आहे. त्यामुळे पोलिस कर्मचाऱ्यांना वरील कार्य पार पाडणे अवघड जाते. म्हणून त्यांना योग्य अधिकार दिले जाणे अपेक्षित आहे. शेवटी अब्राहम लिंकनच्या मते, ''समाजातील, प्रशासनातील सर्वच व्यक्ती त्रास, सहन करण्यास किंवा जबाबदारी पेलण्यास सक्षम व उत्सुक असतात त्यामुळे कोणाचे चारित्र्य पडताळावयाचे असल्यास त्याना अधिकार बहाल करा.''

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net